पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ७३१/२०१४
दिनांक : २८/०८/२०१४

प्रति,

मा.....................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **०५/०९/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०५/०९/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.विधी समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ०४

दिनांक : ०५/०९/२०१४ वेळ : दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०५/०९/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ) दिनांक ०७/०३/२०१४, २१/०३/२०१४, ०४/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९) सभावृत्तांत कायम करणे.

आ) दिनांक ०४/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २०) सभावृत्तांत कायम करणे.

इ) दिनांक १९/०४/२०१४, २१/०४/२०१४, ०२/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) सभावृत्तांत कायम करणे.

ई) दिनांक १६/०५/२०१४, २३/०५/२०१४, ०६/०६/२०१४ व १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २२) सभावृत्तांत कायम करणे.

उ) दिनांक १६/०८/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणे.

ऊ) दिनांक २०/०८/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणे.

----------

**विषय क्र.१)** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ मधील प्रस्तावात नमुद प्रमाणे परिशिष्ट १ ते ६ मधील सेवा भरती करतांना अनुसरावयाची कार्यपध्दती, अधिकारी व कर्मचारी यांच्या पदासाठीची शैक्षणिक अर्हता, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विभागीय परीक्षा नियम, पदोन्नतीसाठी एकत्रित संवर्ग, विविध पदांची पदोन्नती साखळी, अनुसरावयाचे महत्वाचे शासन निर्णयाची यादी यांस महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) (अ) व (ब) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ०५/०९/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** महानगरपालिकेतील कामकाजासाठी काही नवीन विभाग सुरु करणे त्यासाठी आवश्यक असणा-या गट अ ते ड मधील काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ करणे, आवश्यक तेथे नवीन पदांची निर्मिती करणे आवश्यक असल्याने काही संवर्गाच्या पदसंख्येत वाढ सुचविली आहे. तर काही नवीन पदांची निर्मिती करुन त्यांची शैक्षणिक अर्हता, पदोन्नती सोपान, वेतनश्रेणी व पदसंख्या प्रस्तावित करण्यात आलेली आहे. यामुळे महापालिका आस्थापना खर्चात वार्षिक ८९.८९ कोटीने वाढ

होणार आहे. सन २०१२-१३ या वर्षाचा आस्थापना खर्चाची आऊटसोर्सिंगच्या खर्चासह टक्केवारी २३.६१ टक्के आहे. सन २०१३-१४ मधील महसुली उत्पन्न १९२६ कोटी असून आस्थापना खर्च ५०७.६२ कोटी इतका अपेक्षित आहे. आस्थापना खर्चाची टक्केवारी २७.०७ टक्के आहे. नवीन पदांची निर्मिती व पदसंखेत वाढ केल्याने ८९.८९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे एकूण आस्थापना खर्च ५९७.५१ कोटी इतका होईल. हा आस्थापना खर्च सन २०१३-१४ च्या महसूली उत्पन्नाच्या ३१ टक्के इतका होईल. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब ' मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यकता नसणारी अथवा आऊटसोर्सिंगद्वारे कामकाज करुन घेता येऊ शकणारी काही अनावश्यक पदे व्यपगत/निरस्त करणे आवश्यक आहे. प्रस्तावात नमुद प्रपत्र 'ब' नुसार सदर पदे निरस्त करण्यास तसेच प्रपत्र 'अ' नुसार आवश्यक पदांच्या संख्येत वाढ करण्यास व नवीन पदांच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५१ (४) अन्वये मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक ०५/०९/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.३)** महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामधील इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य व पाणीपुरवठा विभागातील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मा.स्थायी समिती ठराव क्र.७०९२ दि.१७/०६/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे. प्रस्तावात नमुद कामांना सुधारित तरतूदीनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.(सुधारित प्रशासकीय मान्यता र.रु.३,७४,००,०००/-)
( दिनांक ०५/०९/२०१४ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे )

**विषय क्र.४)** प्रभाग क्र.६३ रेल्वे गेट ते भंडारी पेट्रोल पंपापर्यंत नाला करणेचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे र.रु.४९,५३,३५३/-(अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख त्रेपन्न हजार तिनशे त्रेपन्न फक्त ) चे खर्चास मंजूरी मिळणेबाबत व विशेष योजना या लेखाशिर्षातील पानांक ४० अ.क्र.११९ वरील नाशिक फाटा उड्डाणपूल येथे पादचा-यांसाठी एफ.ओ.बी. व इतर अनुषंगिक कामे करणे या कामावरील र.रु.२५,००,०००/- वर्ग करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.५)** प्रभाग क्र.४३ पिंपरी येथे जिजामाता हॉस्पिटलची नवीन इमारत बांधणेकामीचे र.रु.३८,४४,००,०००/- (अक्षरी र.रु.अडतीस कोटी चौव्वेचाळीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे कामा करण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.६)** श्री.गावडे दिलीप काशिनाथ यांना खुला या प्रवर्गामधून सह आयुक्त या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६९०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.७)** श्री.गट्टूवार देवन्ना नरसिमल्लू यांना अनु.जमाती या प्रवर्गामधून कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.८)** श्री.गवळी संजय जनार्दन यांना खुला (अनु.जमाती) या प्रवर्गामधून उपमुख्यलेखापाल (अंतर्गत लेखापरिक्षक) या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.९)** डॉ.देशमुख मनोज मोहन यांना खुला या प्रवर्गामधून वैद्यकीय अधिक्षक या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१०)** डॉ.भगत प्रल्हाद कृष्णा यांना खुला (अनु.जाती) या प्रवर्गामधून वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.७६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.११)** भूमकर चौक ते हिंजवडी (प्रजिमा ३१) रस्त्यावरील जकात नाक्याजवळील हिंजवडीनाल्यावर उर्वरित रुंदीचे सी.डी.वर्क्सचे काम धनेश्वर कन्स्ट्रक्शनच्या चालू असलेल्या निविदा क्र.१७/६-२०१३-१४ मधून केल्यास काम लवकर पुर्ण करता येणे शक्य असल्याने स्थळ बदल करणेचे प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३१/२०१४
दिनांक : २८/०८/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.